**सरतपास शपथेवर सुरू**
**सरतपास वादी तर्फे श्री. एम.डी पालीवाल वकील साहेब.**

**०१.** मी साक्षीपुराव्याकरीता शपथपत्र दाखल केले आहे. ते माझया सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आलेले आहे. ते मी वाचुन बघितले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. शपथपत्र नि. ४३ वर आहे.

**०२.** आता मला नि क ४५सोबत दाखल केलेले कागदपत्रे दाखविण्यात आले आहे. अनुक्रमांक १ वर महादेव मंगलूजी राउत यांचा मृत्यू दाखला प्रत दाखल केली आहे त्यास **नि क ४६** देण्यात येते. अनुक्रमांक २ वर शी राउत यांचा शांताबाई महादेव राउत यांचा मृत्यू दाखला प्रत दाखल केली आहे त्यास **नि क ४७** देण्यात येते. अनुक्रमांक ३ वर लिलावती भागडकर यांचा मृत्यू दाखला प्रत दाखल केली आहे त्यास **नि क ४८** देण्यात येते. अनुक्रमांक ४ ते ६ ग्रामपंचायत पारडी आणि ग्रामपंचायत नवेगाव खैरी यांनी दिलेले वारसानप्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास आर्टीकल अ-१ ते अ-३ देण्यात येते. अनुक्रमांक ७ वर पोलीस पाटील पारडी यांनी दिलेले वारसानप्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास आर्टीकल ब देण्यात येते. अनुक्रमांक ८ व ९वर दुययम निबंधक यांना दिलेली तक्रार व पोच दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि क ४९ व ५०** देण्यात येते. अनुक्रमांक १० वर प्रतिवादी यांना पाठविलेली नोटीस आहे. त्यावर माझी व माझे वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. क ५१** देण्यात येते. अनुक्रमांक ११ व १२ वर पोस्टल पावती दाखल केली आहे. त्यास **नि क ५२ व ५३** देण्यात येते. अनुक्रमांक**८१३ व १४** वर पोच पावती दाखल केले आहे. त्यास **नि क ५४ व ५५** देण्यात येते.

०३. अनुक्रमांक १५ ते २६ वाद मिळकतीचे 7@12 उतारा दाखल केले आहे. त्यास अनुक्रमे **नि क ५६ ते ६७** देण्यात येते.अनुक्रमांक २७ वर ८–अ चा उतारा दाखल केला आहे.. त्यास **नि क ६८** देण्यात येते. अनुक्रमांक २८ व २९ वर वाद मिळकतीचे 7@12 उतारे दाखल केले आहे. त्यास **नि क, ६९ ते ७०** देण्यात येते. अनुक्रमांक ३० वर ८–अ चा उतारा दाखल केला आहे.. त्यास **नि क ७१** देण्यात येते अनुक्रमाांक ३१ वर फेरफार क्रमांक २५६ दाखल केला आहे. त्यास **नि क ७२** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री भूपेश पाटील वकील साहेब यांचे तोंडी विनंतीवरुन पूढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(ओ.जे कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.
दिंनाक :- ०६/०६/२०२३

(ओ.जे कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री भुपेश पाटील वकील साहेबः

४. मी भागडकर कुटूंबाचा वारसदार आहे. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. मला ancestral and co-parcenary property या दोन शब्दांचा अर्थ समजत नाही. माझ्या आईवडीलांचे लग्न सन १९७८ साली झाले असे म्हणणे बरोबर होइल. हे म्हण्णे खरे आहे की माझे आजोबा महादेव जंगलुजी राउत यांची मौजा पारडी येथे शेत मिळकत आहे. हे मी सांगु शकत नाही की सदरचा दावा मी मौजा पारडी येथील शेत जमिनी करीता मी दाखल केला आहे किंवा नाही. मी हा दावा खंडाळा येथील शेत जमिनीकरीता केला आहे. हे म्हणणे खरे नाही की लग्ना नंतर माझ्या आईवडीलांचे कौटूंबीक संबंध चांगले नव्हते.

५. हे म्हणणे खरे नाही की सन १९९८ साली माझ्या वडीलांनी माझ्या आईला वडीलाकडून पैसे घेवून ये याकरीता मारहाण केली व माहेरी हकलवून दिले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडील पैसाची मागणी करत असल्यामुळे माझ्या आईच्या वडीलांनी शेत जमिन विकूण आई वडीलांना पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की मी माझ्या आईच्या नावे बँकेत असलेले खातेउतारा व तपशील दाव्यात दाखल केलेला नाही. माझी आई सन २०१६ साली मृत्यू झली. हे म्हणणे खरे आहे की माझी आई मयत होये पर्यंत माझ्या मामाकडे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडे येत जात होती. तसेच सणवारी मुकामी राहत होती.

६. आता मला नि . ७२ वरील फेरफार पंजी उतारा दाखविण्यात आला. दि.३०.१०.२००३ रोजी वाटणी झाल्याचे दिसते. सदर फेरफार

पंजीवरून महादेव राउत यानी विजय आणि नरेन्द्र राउत यांना वाटणी केल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आजोबा महादेव राउत यांचा मृत्यू दि.१८.०४.२००४ रोजी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की माझी आजी शांताबाई महादेव राउत तिचा मृत्यू दि.२७.०८.२००२ रोजी झाला होता. माझी आई महादेव राउत यांच्या मृत्यू नंतर १२ वर्षाने मयत झाली.

७. हे म्हणणे खरे आहे की दि.१८.०४.२००४ पासून ते माझी आई मयत होई पर्यंत तिने वाटपासाठी दावा नोटीस तहसील कार्यवाही किंवा पोलिस रिपोर्ट यापॅकी कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.१८. ०४.२००४ रोजी महादेव राउत मयत झाले त्यावेळी त्यांच्या नावे दावा मिळकतीपॅकी कोणतीही मिळकत नव्हती. हे मला माहीत नाही की माझी आई मयत होण्यापुर्वी तिच्या नावावर वाद मिळकत होती किंवा नाही. वाद मिळकत ही माझ्या आईच्या नावे असल्याबाबतचे कागदपत्र मी दाव्यात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी सन २००३ सालच्या दिवाळी सणाला महादेव राउत यांना इशारा दिला होता की तुम्ही मुलांना सगळी मिळकत दिली तर तुम्ही महातारपणी काय करणार?

८. हे म्हणणे खरे नाही की महादेव राउत यांच्या मृत्यूनंतर माझ्या वडीलांनी माझ्या आईला केस दाखल करण्यासाठी दबाव आणला होता. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.३ आणि ४ यांच्या नावे बक्षीसपत्राने वाद मिळकत केली आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. ३ आणिा ४ यांचे नाव सात बारा उतारावर दर्ज झाले आहे. माझे वडील सन २०१८ साली प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडे कधीही गेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मुळ दाव्यात माझे वडील वादी होते व आहे. मी प्रतिवादी क्र.१ व २

यांच्याकडे वाटणी मागण्यासाठी गेलो होतो त्यामुळे दाव्यात तसेच नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.०७.०२.२०१८ पर्यंत वाद मिळकत हस्तांतरीत करण्यास न्यायालयाचा मनाई आदेश नव्हता.

प्रश्नः तुमच्या आजोबांनी मयत होण्यापुवीर वाद मिळकतीची वाटणी केली होती हे तुम्ही दाखल केलेल्या कागदपत्रावरु स्पष्ट होते असे म्हणणे बरोबर होईल का.

उत्तरः ते सिध्द आहे परंतू मला ते माहीत नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ आणि २ यांना करून दिलेले वाटणीपत्राविरुध्द माझ्या आईने किंवा माझ्या आजोबांनी न्यायालयात दावा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व इतर वादींचा वाद मिळकतींशी कोणता ही हक्क व हित संबंध नाही. हे म्हण्णे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याकडून पैसे हडपण्यासाठी खोटा दावा दाखल करून खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.२ ते ४ हे वादी क्र.१ सुभाष भागडकर यांचे वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ हे गणपत नेवजी भागडकर यांचा वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही गणपत नेवजी भागडकर यांची नाही.

उलटतपास पुर्ण.
फेर-तपास नाही.
श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

(ओ.जे कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

(ओ.जे कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

दिंनाक:-११/०७/२०२३